# वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय,
गडचिरोली. दि. ०७/०२/२०१९

## अपयशी नक्षलवादयांकडून एका निष्पापाची हत्या

काल दिनांक ०६/०२/२०१९ रोजी रात्रौ १२.०० ते १.०० वाजता दरम्यान उपविभाग भामरागड अंतर्गत पोमके नारगुंडा हद्दीतील मौजा विसामुंडी येथे आनंदराव सत्तु मडावी ,वय ३२ वर्ष, रा. विसामुंडी याची नक्षलवादयांनी गोळी झाडून हत्या केली.

काल रात्री पेरमिली एरीया कमीटीचे १०-१५ सशस्त्र नक्षलवादयांनी आनंदराव याला झोपेतून बळजबरीने घराबाहेर ओढून मारहाण करीत गावापासून काही अंतरावर नेवून निर्घृणपणे गोळी झाडून हत्या केली. आनंदरावच्या वडीलाचाही २०१० मध्ये पोलीस खबरी असल्याच्या संशयावरुन नक्षलवादयांनी खून केला होता. निष्पाप आदिवासींची हत्या करुन नक्षलवादयांनी निर्दयतेचा कळस गाठला आहे.निष्पाप आदीवासींची नक्षलवादयांनी हत्या केल्याने जनतेमध्ये तीव्र रोष व्यक्त होत आहे. अशाप्रकारच्या नक्षलवादयांनी केलेल्या मनोविकृत कृत्यांचा विरोध करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

सदर परिसरात नक्षल शोध मोहीम अधिक तीव्र करण्यात आलेली आहे. नक्षल्यांविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आलेला असून घटनेचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.